NATIONAL HEALTH MISSION, MAHARASHTRA
NHM
राष्ट्रीय आरोग्य अभियान
महाराष्ट्र

# राष्ट्रीय आरोग्य अभियान

आरोग्य विभाग, जिल्हा परिषद नंदुरबार

नंदुरबार

| | |
|---|---|
| दुरध्वनी क्र. - ०२५६४ - २१०१२५<br>ई-मेल आयडी - dpmnandurbar2@gmail.com | जिल्हा परिषद नंदुरबार, नविन प्रशासकिय ईमारत,<br>टोकरतलाव रोड, नंदुरबार - ४२५४१२ |


जा.क्र./आरोग्य/रा.आ.अ/हे.वे.सें./उमेद.सुचना पत्र/1075/२०२० दिनांक :- 24/०२/२०२०

## -: जाहीर सुचना :-

आपणास कळविण्यात येते की, समुदाय आरोग्य अधिकारी या पदासाठी प्रवेश परीक्षा २ फेब्रुवारी २०२० रोजी घेण्यात आली . या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना प्रशिक्षणासाठी निवड प्रक्रीया करीता उमेदवारी अर्जांची हरकती सुचना तसेच मुळ कागदपत्रांची पडताळणी करीता तसेच सामाजीक व समांतर आरक्षणानुसार उमेदवारांची निवड करतांना सामाजीक व समांतर आरक्षणाचा लाभ प्रत्येक पात्र उमेदवारांस मिळावा यासाठी उमेदवारांकडुन काही आवश्यक प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक आहे. अनु. जाती/ जमाती/इमाव/ विजाभज/ विमाप्र प्रवर्गाचा लाभ घेणा-या उमेदवारांनी जातीचा दाखला सादर करणे आवश्यक आहे तसेच अनु.जाती व जमाती प्रवर्गाचे उमेदवार वगळता विजाभज/इमाव/विमाप्र प्रवर्गाच्या उमेदवारांना सामाजीक आरक्षणाचा लाभ हवा असल्यास चालु वर्षाचे वैध नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करणे देखील आवश्यक आहे. त्याच प्रमाणे समांतर आरक्षणांतर्गत महिला राखीव प्रवर्गाचा लाभ घेण्यासाठी अनु. जाती/ जमातीच्या महिला उमेदवार वगळता ३० % महिला जागेकरीता राखीव पदासाठी ३० % महिला आरक्षण व नॉन क्रिमीलीअर प्रमाणपत्र आवश्यक राहील. प्रकल्पग्रस्त व खेळाडु या समांतर आरक्षणाचा लाभ घेणा-या उमेदवारांनी सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

तसेच कागदपत्रा अभावी सामाजिक समांतर आरक्षणाचा लाभ न मिळाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संबधीत उमेदवाराची राहील याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी. उक्त रोजी उमेदवार गैरहजर राहिल्यास सदरील भरती प्रक्रियेतुन उमेदवारी रदद समजण्यात येईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

दिनांक २५/०२/२०२०

ठिकाण व वेळ - आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, नंदुरबार येथे सकाळी ९.३० वाजता उपस्थित रहावे.

(डॉ.एन.डी.बोडके)
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद,नंदुरबार